# " संगीत एक कला"

**प्रेमीला जोतिबा पाटील,** संशोधक विद्यार्थीनी , मराठी अधिविभाग , शिवाजी विद्यापीठ , कोल्हापूर .

.........................................................................................................................................................................

प्रस्तावना: जीवन जगत असताना मानवाला अनेक कला अवगत असाव्या लागतात.प्रत्येक माणसाच्या अंगात अनेक कला असतात. पण त्या कलांचा विकास करण्यासाठी विशिष्ट प्रशिक्षणाची गरज असते . तर काही कला हया उत्स्पूर्तपणे होत असतात. त्याला विशेष प्रशिक्षणाची गरज नसते. यामध्ये चित्रकला, नृत्यकला, नाटयकला, शिल्पकला, संगीतकला, गायनकला , भाषणकला इ.कला मोठया प्रमाणात प्रसिध्द आहेत.या कलामध्ये संगीतकला ही परंपरागत आलेली प्राचीन कला आहे .संगीतकला ही एक लोककला म्हणून ओळखली जाते. संगीतकला ही भारतीय परंपरेमध्ये सर्वश्रेष्ठ कला म्हणून ओळखली जाते. भारतीय संगीत एखादया अथांग महासागरासारखे आहे. ळाहानमोठया नळांचे प्रवाह सागरास मिळतात. त्याप्रमाणे निरनिराळया संगीतपध्दती या महासागराशी एकरूप झाल्या आहे. लोकसंगीत आदिवासी व भटक्या जमातींची गान परंपरा प्रादेशिक संगीत, धार्मिक संप्रदायाची गीतपध्दती असे सागराने परदेशी गायनपध्दतीचेही स्वागतच केले आहे. मध्य आशिया खंडातील तुरूष्कपदध्ती आणि इराणी संगीतातील यमन सारखे राग यांना भारतीय संगीताने अपक्त ठरविले नाही. विविधतेतही एकात्मता ही भारतीय संस्कृतीचे वैशिष्ठय संगीताच्या आढळेल. सागरावर भरतीचे प्रसंग आले तसेच ओहोटीचे पण हा सागर कोरडा कधी पडला नाही. त्याचा तळ कधी कुणाला दिसला नाही.

सागरासंवधी एक संस्कृत सुभाषित रूढ आहे. सागराचा विस्तार एखादा हनुमंत सांगू शकेल परंतु त्याच्या गहराईची विश्वसनीय साक्ष मात्र मंढार पर्वतच देऊ शकेल. संगीताचा विस्तार आणी खोली यांनाही हे सुभाषित सारखेच लागू पडते. आजवर होऊन गेलेल्या शास्त्रकारांच्या आधाराने संगीताचा विस्तार व सखोलता यांचा थोडा फार अंदाज बांधताा येईल. संपूर्ण आकलन जवळपास अशक्य तरीही पूर्वसूरांना वाट पूसत या विद्येचे स्वरूप दर्शन घेण्याचा प्रयत्न करण्यास सुरवात केली.

आधुनिक युगात साहित्य आणि संगीत एकमेकांपासून एवढे दुरावले आहेत की, ते कधीकाळी एकत्र नांदत होते. पावर विश्वास वसणे कठीण प्राचीन मराठी काव्याची निर्मिती झाली त्याकाळात अशी परिस्थिती नव्हती. पा काव्याला संगीताने केवळ घाट दिला असे नव्हे. टर साधुसंतांच्या मुखातून निघालेली वाणी समाजाच्या अगदी खाालच्या थरापर्यंत पोचती करण्याची अत्यंत महत्वाची कामगिरी संगीताने बजावलेली आहे. साहीत्य समाजाभिमूख राहीले आणि समाजावर ही साहीत्याचा प्रभाव पडला तो साहीत्य व संगीत एकरूप होउन नांदत असल्या कारणाने महाराष्ट्रात संस्कृतीची जोपासना झाली ती साहीत्य आणि संगीत यांच्या सहयोगाने.

संगीतशास्त्रामध्ये कंठय संगीतशास्त्रामध्ये कंठयसंगीत हे संगीताचे एक अग्ग आहे. गीत, वादय आणि नृत्य या त्रयींना संगीत म्हणतात. संगीतामध्ये अभंग ,गौळणी, पद, विराण्या, लावणी या मुळातच गेयरचना असतात. संगीत म्हणजे काय?

"गीत म्हणावे गायनास |
नर्तनास नृत्य म्हणावे|
शव्द होतो त्यास म्हणावे वादय|
तिन्हीयुक्त त्यास संगीत म्हणावे| "

गति वादय वा नृत्य हे तीन घटक एकत्रितपणे असतील तरच त्याला संगीत असे म्हणतात. संगीताचे लोकसंगीत आणि शास्त्रोक्त संगीत असे दोन प्रकार करण्यात आले आहेत. ओवी,. पोवाडा, धवळे, पागूळे(भारूड) आणि गदय प्रवंध हे लोकसंगीतात मोडतात तर पद आणि चौपदी यांची गणना शास्त्रोक्त संगीतात केली जाते.

**संगीताचे प्रकारः-** १) स्वरसंगीत २)वर्णसंगीत ३)तालसंगीत इ.आहेत. या व्यतिरीक्त शास्त्रीय संगीत इ.प्रकार आढळतात.
लोकसंगीत या प्रकारामध्ये भारूड. गौळण, भक्तीगीते , .लावण्या इ.चा समावेश होतो.
मला भावलेला संगीत प्रकार ः-

ढोलकीच्या तालावर घुंगराच्या वोलावर
मी नाचते मी डोलते..............

ज्या संगीतामध्ये ढोलकी तुनतूने. घुंगराचा वापर केला जातो ते संगीत म्हणजे लावणी होय. लावणी हा प्रकार महाराष्ट्रामध्ये लोकप्रिय असा प्रकार आहे. त्यातल्या त्यात "कोल्हापूर" हे शहर लावणीसाठी प्रसिद्ध आहे. लावणी ही माणसाला मोहात पाडणारी आहे. लावणीतील संगीताकडे कोणत्याही वयातील व्यक्ती आकृष्ट होते.लावणीमध्ये सर्वात महत्वाचे वादय म्हणजे ढोलकी ढोलकीच्या तालावर आपल्या पायात घुंगरे बांधून नृत्यांगणा नृत्य करीत असताना गाण्याच्या वोलाणूसार तीच्या चेहऱ्यावरील हावभाव वदलत असतात.

इसवी सनाच्या दुसऱ्या शतकापासून चालत आलेले लोकजीवनाचे सत्व उरी पोटी जतन करणारी लावणी लोकनृत्य आणि अभिजात नाटय यांच्या संगमावर उभी आहे. लोकरंजन करण्याचे एक आगळे वेगळे सामर्थ्य लावणीच्या अंगी आहे. संगीताच्या परंपरेत लावणी हा पदवंध संगीताचा पुर्वावतार ठरतो. कारण लावणीत गीत. वादय. आणि नृत्य या तिन्ही घटकांसारखेच प्राधान्य देण्यात आलेले आहे.

गति आणि नृत्याभिनय यांच्यादवारे भावाविष्कार करून श्रोत्यांना रस प्रत्यय घडवणे हे लावणीचे उदिदष्टय असते. लावणी हा स्वतंत्र आविष्कृती माध्यम असलेला प्रकार आहे. लावणी, गीत,. वादय. आणि नृत्य यांच्या अंगाने नाटयाभिनयासरंग पीठावर प्रदर्शित होतअसते.

आज मात्र लावणी या शब्दाच्या उच्चाराबरोबर नृत्यनाटयाव्दारे नायिकेच्या भावाभिनयासह आणि सोंगाडयाच्या साथीने रंगपीठावर उभा राहणारा शृंगाररस प्रधान प्रयोग डोळयांसमोर उभा राहतो नायिकेचे नृत्य तदव्दारे घडणारा शृंगाररस प्रधान अभिनय सोंगाडयाच्या संवादातून होणारी वातावरण निर्मिती व अधूनमधून उद्भवणारे हास्य या सर्वाचे साहचर्य लावणी या शब्दाशी एवढे निगडीत झाले आहे की. या प्रभावळिविना लावणी असू शकते याची कल्पना आपण करू शकत नाही.

लावणीमध्ये वादयांना खुप महत्त्व असते. ह्यादय नसेल तर लावणी होऊ शकत नाही. लावणीचे विशेष असे संगीत असते. नायिका ढोलकीच्या तालावर नाचत असते ढोलकी,. तूनतूने,. सुरपेटी,. टाळ ही लावणीतील विशेष वादय आहे. लावणी सुरू होण्याच्या अगोदर बराच वेळ वेगवेगळया प्रकारामध्ये ढोलकी वाजवून वातावरण निर्मिती केली जाते. ढोलकीच्या तालावर नाचताना नृत्यांगना आपले देहभान हरपून नाचत असते. लावणीचे संगीत हे ठसकेबाज असते. लावणी गीताला नृत्याची जोड दिल्यामुळे लावणी अधीकच रंगतदार होते. गीतातील भावनृत्याभिनयाच्या योगाने नायिका आविष्कृत करीत असते. गीत,. नृत्य. आणि अदाकारी याचा त्रिवेणी संगम म्हणजे लावणी. लावणी ही आपल्या महाराष्ट्राची शान आणि श्रृंगाराची खान म्हणून ओळखली जाते. लावणीमध्ये कालमानानुसार काही स्थित्यंतरे घडली असती तरी तिचा नृत्य नाटयात्मक पिंड मात्र मुळीच वदलला नाही.

लावणी म्हणजे मीठ जशी मठिए शिवाय जेवणाला चव येत नाही तशीच लावणी शिवाय कुठल्याही मनोरंजन कार्यकमाला लज्जत येत नाही लावणी प्रथम दर्शनी मनात भरते ती तिच्या ठसकेबाज ध्रुपदावरून लावणीचे तोंड प्रेक्षकांच्या अंतकरणावर खोलवर परिणाम करून जाते.

उदा : "लटपट लटपट लटपट लटपट

तुझ चालणं मोठया नखऱ्याचं
चालणं ग मोठया नखऱ्याचं
बोलणं ग मंजुळ मैनेचं........
नारी ग......नारी ग......हे नारी ग हे नारी ग हे नारीग

प्रेक्षकांनी उत्सपुर्तपणे ठेका धरावा एवढी धमक या धुपदात निश्चितच आहे. शब्दांची जडणघडण आणि रचनाचातुर्य यांच्याच दृष्टीने केवळ या धुपदांना महत्त्व आहे. असे नाही अनुरूप ताल पदन्यास अभिनय आणि त्यांना साजेल असे गति यांच्या प्रभावळीसह नायिका रंगभूमीवर प्रवेश करते. त्यावेळी या ध्रुपदांचा प्रेक्षकांच्या मनावर कोणता. परिणाम घडत असेल याची कल्पना केली तरच या ध्रुपदांत असणारे सामर्थ्य ध्यानात येईल.

लावणी वाङ्मयाची रचना करताना रचनाकारांनी नृत्याभिनयास भरपूर वाव मिळेल अशी रचना केली आहे. नृत्य आणि भावाविष्कार यांना भरपूर अवसर लाभावा या हेतूने लावण्यात नायिकेचे वर्णन केलेले असते.

अशाप्रकारे मनोरंजनाचे एक साधन म्हणून संगीताकडे पाहिले जाते. जर माणसाच्या जीवनात संगीतच नसेल तर त्याचे जीवन हे निरर्थक होऊन जाईल. म्हणून संगीत निर्मिती करणाऱ्या कलावंतांना धन्यवाद दिले पाहिजेत. यामध्ये पंचम आर.डी.बरमन. खय्याम. ए.आर.रहेमान. अजय-अतुल,. नौशाद, अनिल, विश्वास,. शंकर, जयकिशन,. मदन, मोहन अशा कितीतरी संगीतकारांची नावे सांगता येतील.यांनी अनेक गाण्यांना संगीत देऊन आपल्या तालावर नाचावयास शिकवले.

संदर्भग्रंथ :-

१) गणोरकर, प्रभा :- "वाङ्मयीन संज्ञा संकल्पना कोश" , २००१
जी आर भटकळ फांउण्डेशन, मुंबई.
२)कोतापल्ले,नागनाथ :- "साहित्य आणि समाज",. प्रतिमा प्रकाशन, पुणे,. २००७.